# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

प्रकाशगड, २रा माळा, प्रो. अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी : २६४७४२११ विस्तारीत - ३६४२ दूरभाष : २६५८ १५१६
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com


**संदर्भ :** मा.सं./जनसंपर्क/वृत्तपत्र टिप्पणी/

## प्रेस नोट

## महानिर्मितीचा शिर्सुफळ, ता. बारामती येथील सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित

**मुंबई - दि. २६/११/२०१४.**

आज दि. २६/११/२०१४ रोजी महानिर्मितीचा शिर्सुफळ, ता. बारामती येथील एकूण ५० मेगावॅट क्षमतेचा ग्रीड कनेक्टेड व क्रिस्टलाईन तंत्रज्ञानावर आधारित सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला. सदर प्रकल्पाचे भुमिपूजन दि. १३ जुलै २०१४ रोजी झाल्यानंतर अतिशय विक्रमी वेळेत ही कामगिरी पार पाडून प्रत्यक्ष वीज उत्पादन सुरु करण्यात महानिर्मितीला लक्षणीय यश आले आहे.

एकूण ५० मेगावॅट क्षमतेचा सदर प्रकल्प दोन टप्प्यांत उभारला जात असून सध्या पहिल्या टप्प्यात महानिर्मितीने आज दुपारी सुमारे २.०० वाजता या सौर प्रकल्पातून प्रत्यक्ष वीजनिर्मिती सुरु केली आहे. हा प्रकल्प पूर्ण ५० मेगावॅट क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर त्यातून प्रतिवर्षी सुमारे ८३ दशलक्ष युनिटस् इतकी वीजनिर्मिती अपेक्षित आहे.

महानिर्मिती उभारत असलेला हा प्रकल्प त्याच्या खात्रीशीर महसुली परताव्याच्या तरतुदीमुळे शासन-खाजगी सहभाग प्रारुपातून (Public-Private Partnership Model) उभारला जाणारा देशाच्या ऊर्जाक्षेत्रातील अशा प्रकारचा पहिला वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्प आहे. देशाच्या ऊर्जाक्षेत्रात या नवीन संकल्पनेचा स्वीकार करणारी महानिर्मिती ही पहिली वीजनिर्मिती कंपनी ठरली आहे. या प्रकल्पाची संपूर्ण मालकी महानिर्मितीची आहे.

महानिर्मितीच्या चंद्रपूर ५ मेगावॅट व शिवाजीनगर, ता. साक्री येथील १२५ मेगावॅट क्षमतेच्या देशातील सर्वांत महाकाय सौर ऊर्जा प्रकल्पपूर्तीनंतर आता शिर्सुफळ, ता. बारामती येथील हा सौर ऊर्जा प्रकल्प पूर्ण झाल्यावर महानिर्मितीची एकूण सौर ऊर्जा स्थापित क्षमता १८० मेगावॅट इतकी होणार आहे.

---

दिनांक : २६/११/२०१४.

प्रति,
**माननीय संपादक,**
दैनिक / वृत्तवाहिनी

आदरणीय महोदय,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तीत / वाहिनीवर प्रसिध्द करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**